# छंद पुष्परचनेचा - इकेबाना ३

भारतीय संस्कृती प्रमाणेच जपानी लोकही कुटूंब संस्था महत्वाची मानतात. त्याचे प्रतिबिंब जपानी पुष्परचनेमध्ये अगदी ठळकपणे दिसते. जपानी पुष्परचना करताना फुले, पाने, फांद्यांची जी मांडणी केली जाते त्यामध्ये कुटूंब या संकल्पनेला महत्व दिलेले आहे. कोणत्याही पुष्परचनेमध्ये कमीतकमी तीन फुले,पाने किंवा फांद्या वापरल्या जातात. आई, वडील व मुल या कुटूंबातील तीन घटकांचे प्रतीक म्हणुन तीन फांद्या वापरल्या जातात. काही वेळा तीन घटक म्हणजे पृथ्वी, आकाश व माणूस असाही अर्थ मानला जातो. शोका रचना करताना हे तीन घटक म्हणजे मानवी जीवनातील तीन काळ भूतकाळ, वर्तमानकाळ, भविष्यकाळ असे मानले आहे.

सर्वात महत्वाची व मोठी फांदी अथवा फुल असेल त्याला **शिन** असे म्हटले जाते. पुष्पपात्राच्या उंचीच्या प्रमाणात शिनची उंची किती घ्यायची याचे नियम ठरलेले असतात. दुसरी महत्वाची फांदी अथवा फुल असेल त्याला **सोय** असे म्हणतात. तिसरी फांदी किवा फुल असेल त्याला **ताय** असे म्हणतात. फक्त या तीन फांद्या लावल्या की पुष्परचना पूर्ण होत नाही.या तीन फांद्या वेगवेगळ्या कोनामध्ये लावायच्या असतात. या तीन फाद्यांमधील जागा भरुन काढण्यासाठी काही पूरक फुले, पाने, फांद्या वापरल्या जातात त्याला **अशिराय** किंवा फिलर असे म्हणतात. अशिरायसाठी नाजुक फुले वापरली जातात. (स्टॅटीस, लेडीज लेस, ऍस्टर, शेवंती

इत्यादि फुले वापरतात.) **शिन, सोय, ताय** व **अशिराय** यांच्या योग्य मांडणी, रंगसंगतीतून पुष्परचना आकार घेते.

मागील लेखात पुष्परचनेचे पाच वेगवेगळे प्रकार कोणते हयाची अगदी थोडक्यात माहिती घेतली होती. पुष्परचना शिकताना **मोरिबाना** रचनांचा प्रथम अभ्यास केला जातो. या रचना सोप्या व सहज जमणाऱ्या असतात. पुष्परचनेचा प्राथमिक अभ्यास करणाऱ्यांनी मोरिबाना रचनांपासून सुरुवात करावी. या रचना करताना पसरट व मोठ्या तोंडाचे पुष्पपात्र वापरले जाते. पुष्पपात्राच्या मध्यभागी पिन होल्डर वापरुन मोरिबाना रचना केल्या जातात. मोरिबाना रचना करताना शिन या मुख्य फांदीची उंची ही पुष्पपात्राच्या उंचीच्या दिड ते दुप्पट एवढी घेतली जाते. सोय या फांदीची ऊंची शिनच्या ऊंचीच्या दोन त्रितीअंश व ताय या फांदीची उंची शिनच्या एक त्रितीअंश एवढी असते. तायची फांदी अथवा फुल हे शिन व सोय पेक्षा नाजुक असावे. रचनाकाराच्या आवडीनुसार फांद्या, फुले, पानांची उंची थोडी कमी जास्त करता येते. फुले व फाद्यांचे नैसर्गिक वळण आणि शिन हया फांदीने पुष्पापात्राशी केलेला कोन या नुसार मोरिबाना रचना तीन प्रकारच्या असतात. यातील कोणतीही रचना करताना प्रथम कोणते साहीत्य वापरायचे, फुलापानांची रंगसंगती, पुष्पापात्राचा आकार, रंग इत्यादी गोष्टींची योजना करुन मग सुरुवात करावी.

**१.चोकुताई रचना  २.शाताई रचना  ३.सुई-ताई रचना**

**१.चोकुताई रचना-**






साधारणपणे सरळ दांडा अथवा देठ असणारी असणारी फुले, पाने या प्रकारात वापरली जातात. जर्बेरा, ग्लॅडीओला, बर्ड ऑफ पॅरेडाईज, निशिगंध, गुलाब शिन व सोयसाठी वापरावीत. यामध्ये शिनने पुष्पपात्राशी केलेला कोन ३० एवढा असतो. फोटो १ मध्ये पुढचे बर्ड ऑफ पॅराडाईज शिन म्हणुन वापरले आहेव त्या मागचे दुसरे बर्ड ऑफ पॅराडाईज शिनला पूरक म्हणुन आहे. डाव्या बाजूला त्याचेच मोठे पान सोय म्हणुन वापरले आहे व ताय हे अगदी पुढे दिसणारे कैला लिलीचे फुल आहे. इतर सर्व् फुले पूरक किंवा अशिराय म्हणुन वापरली आहेत.

२.**शाताई रचना-**






यामध्ये शिनने पुष्पापात्राशी केलेला कोन ६० एवढा असतो.मोठी मनी प्लॅटची पाने, अन्थुरिअम किंवा चिक्कु, मोगरा, जाई, जुई, कामिनी, चिंच, अनंत, मेपल, पाईन, चेरी इत्यादी झाडांच्या फांद्या शिन व सोय साठी वापरता येतात. फुले व फांदीचे नैसर्गिक सौंदर्य यातून सहज मांडता येते. फोटो २ मध्ये सर्वात उंच असलेले अन्थुरियम हे शिन आहे. त्या खलोखल असलेले अन्थुरियम हे सोय म्हणुन आहे. अगदी डावीकडे असलेले छोटे तिरके शेल जिंजरचे पान हे ताय आहे. दुसरे मोठे पान, ऍस्टर,असपॅरॅगस ही पूरक पाने व फुले आहेत.

३.**सुई-ताई रचना-**






यामध्ये वेली किवा झुकणारे मटेरीअल वापरले जाते. असपॅरॅगस, फॉक्स टेल, बॉटल ब्रश, बेरीज, गवताचे काही प्रकार हे शिन व सोय साठी वापरता येते. अशा प्रकारच्या पाने, फांद्याचे नैसगिक सौंदर्य खुलून दिसण्यासाठी उंच, मोठ्या तोंडाचे पुष्पपात्र वापरले जाते. शिन फांदी ९० पेक्षा जास्त कोनातून वळून पुष्पपात्राच्या खालच्या बाजूकडे झुकते. या रचनांमध्ये शिनच्या फांदीचा खालच्या बाजूकडे झुकणारा डौल खुप महत्वाचा आहे. झाडावरुन फांदी तोडताना किंवा विकत घेतानाच फांदीचे वळण व ती कुठे कशी वापरायची याचा विचार असावा. फोटो ३ मध्ये डौलदार वळणाचे खाली झुकणारे शिन हे असपॅरॅगसचे आहे. शिनकडे ६० ते ७० अंशात वळणारे उंच डॅफोडील हे सोय आहे. तिसरे छोटे डॅफोडील हे ताय आहे व स्वीट पीची गुलाबी फुले, डॅफोडीलची पाने अशिराय म्हणुन वापरली आहेत. पुढे दिसणारे बिगोनियाचे पान हे रचनेला पूर्णत्व देण्यासाठी लावले आहे.

**सौ.अरूंधती शिरीष देशपांडे**

asdssd@gmail.com

**मेंबर, इकेनोबो इकेबाना फ्लोरल आर्ट, जपान**

**(काही माहिती - नाते फुलांशी ( सौ.अरुंधती देशपांडे लिखित),मराठी विश्व,यांच्या सौजन्याने)**